पैज

अर्मेनियन लोककथा



संकलन आणि चित्रे: नॉनी हॉन्ग्रेग्रीयन

मराठी अनुवाद: तृप्ती कर्णिक

हमायाग आणि हराद ह्या दोन लुटारूंची एकदा एका डाळिंबाच्या झाडाखाली अकस्मात भेट होते. दुपारच्या जेवणाची वेळ होती म्हणून दोघेही आपापलं गाठोडं उघडतात आणि काय आश्चर्य, दोघांच्याही शिदोरीमध्ये खाण्याचे पदार्थ तंतोतंत सारखे! आणि त्यांच्या लवकरच लक्षात येतं की त्यांना एकसारखं जेवण बनवून देणारी एहलिजा ही एकच व्यक्ती आहे. जिच्यावर दोघांचंही प्रेम असतं आणि तिच्याशी लग्न ठरलेलं असतं.

दोन्ही लुटारू आपली प्रेयसी गमवायला तयार नव्हते म्हणून एहलिजासाठी दोघांनी एक पैज लावली. त्यानुसार दोघांमध्ये जो चोर जास्त चतुर त्याची एहलिजा असं ठरलं. पैज तर सुरु झाली पण कहाणीचा शेवट मात्र त्या दोघा चोरांच्या अथवा वाचकांच्या अपेक्षेपेक्षा अगदी वेगळा होतो.

नॉनी हॉन्ग्रेग्रीयनने ही मुळ लोककथेतील गुंतागुंतीची प्रेमकहाणी अतिशय सुदंर चित्रांद्वारे तसेच हमायाग आणि हराद ह्या दोन चांगल्या मनाच्या चलाख चोरांमधील चुरस काळ्या-पांढ-या रेखाचित्रांच्या सहाय्याने अतिशय प्रभावीपणे मांडली आहे.

पैज

अर्मेनियन लोककथा



संकलन आणि चित्रे: नॉनी हॉन्ग्रेग्रीयन

मराठी अनुवाद: तृप्ती कर्णिक






एरजिंगा गावाजवळच्या उंच पहाडांमध्ये हमायाग आणि हराद असे दोन लुटारू राहत होते.

हमायाग दिवसा लुटमार करायचा आणि नंतर एहलिजाबरोबर- आपल्या होणाऱ्या बायकोबरोबर संध्याकाळ घालवायचा.

हराद रात्रीच्या वेळी चोऱ्या करायचा आणि दिवसा आपल्या भावी वधूबरोबर वेळ घालवायचा. आणि तिचंही नाव एहलिजा होतं.


पण खरी गोष्ट अशी होती की दोघेही एकाच एहलिजावर प्रेम करत होते आणि तरीही ते एक-दुसऱ्यांना अजिबात ओळखत नव्हते.








एका संध्याकाळी हमायाग एहलिजाच्या घरी जात होता तर हराद एहलिजासाठी लुट शोधत होता तेव्हा दोघांनीही मनात आपल्या भविष्याबद्दल काही विचार पक्का केला. दुसऱ्या प्रांतात जाऊन आपलं नशीब आजमावून पाहायचं असं दोघांनीही ठरवलं. दोघांनी तयारी केली आणि एहलिजाने दोघांना प्रवासात खाण्यासाठी शिदोरी बांधून दिली.




हमायाग रोजच्या प्रमाणे सकाळच्या वेळेत लवकर निघाला. त्याला असंही दिवसा काम करायला आवडायचं. आणि काही वेळाने हरादही निघाला कारण त्याला इच्छित स्थळी रात्रीपर्यंत पोहोचायचं होतं.

आणि योगायोगाने दोन्ही लुटारू दुपारच्या वेळी जेवणासाठी एकाच डाळिंबाच्या झाडाखाली थांबले. दोघांनीही एकमेकांची ओळख करून दिली आणि दोघेही एहलीजाने काय खायला दिलं आहे हे पाहण्यासाठी आपापल्या शिदो-या उघडू लागले.



हमायागच्या डब्यामध्ये थोडं पनीर आणि ऑलिव्ह होते तर हरादच्या डब्ब्यातही तेच होतं. हरादने सुक्या मांसाची छोटी डबी बाहेर काढली आणि हमायागनेही तेच केलं. त्याबरोबरच दोघांच्याही शिदोरीमध्ये एक टोमेटो, तीन पातीचे कांदे आणि चार मोठे अक्रोड होते.



इतका योगायोग पाहून दोघेही आश्चर्यचकित झाले. आपल्यामध्ये काहीतर अदृश्य नातं आहे ह्याची त्यांना जाणीव झाली. दोघेही एकत्र प्रवास करू लागले आणि एकमेकांमधलं साम्य शोधू लागले.

“मी मोठ्या चतुराईने पैसा कमावतो.” हमायाग म्हणाला.

“मी ही असंच करतो."

“खरं सांगू का मी एक चोर-लुटारू आहे.” हमायाग म्हणाला.

“मी ही."

“एरजिंगा गावाजवळच्या उंच पर्वतरांगांमध्ये मी राहतो." हमायाग म्हणाला.

“माझंही घर तिकडेच आहे."

“आणि तिथली सर्वात गोड मुलगी एहलिजाबरोबर माझं लग्न ठरलं आहे."

“ती माझी भावी बायको आहे.”

“नाही, ती माझी होणारी बायको आहे.” हमायाग ठासून म्हणाला.

आपापल्या प्रेमिकेचं वर्णन करताना दोघेहो उत्तेजित झाले पण त्यांना थोड्याच वेळात खरं काय ते कळून चुकलं.

हमायाग म्हणाला, “तू माझ्या भागामधे चोरी करतोस ह्याचं मला दुःख नाही. पण माझ्या भावी पत्नीबरोबर मी तुला कदापि लग्न करू देणार नाही.”

“पण ती फक्त माझी आहे!” हराद ओरडला. दोघं हमरीतुमरीवर आले. पण थोड्या वेळाने त्यांना समजलं की असं भांडून काही आपली समस्या सुटणार नाही.

"ठीक आहे, आपल्या प्रेमळ लबाड प्रेमिकेला आपल्यापैकी एकाचीच निवड करावी लागेल आणि तो कोण ह्याचा निर्णय आपणच घेऊ."
हमायाग आणि हराद दोघांनाही स्वत:वर पूर्ण विश्वास होता त्यामुळे दोघेही ह्यावर सहमत झाले. त्यांनी पैज लावली की ह्या उंच पहाडी प्रदेशातला सर्वात चतुर चोर कोण हे सिध्द करून दाखवायचं. जिंकेल तो एहलिजाबरोबर लग्न करेल. .


शहराच्या मुख्य दारातून ते आत शिरले तेव्हा अजूनही दिवस पूर्ण सरला नव्हता म्हणून हमायागने आपली चलाखी पहिल्यांदा दाखवायची ठरवलं. एक माणूस छोटीशी थैली घेऊन सोनाराच्या दुकानाच्या दिशेने जाताना त्याच्या नजरेस पडला. हमायागने हळूच ती थैली त्या माणसाकडून पळवली. त्यात त्याला सोन्याचे दागिने दिसले. ते सोन्याचे दागिने काढून त्या थैलीत त्याने दगड भरले आणि थैली त्या माणसाला परत केली.



अर्थातच हे सांगायला नको की ती थैली उघडल्यावर तो माणूस आणि सोनार खूपच आश्चर्यचकित झाले. त्या माणसाचा चेहरा लाल झाला. काहीतरी पुटपुटत त्याने ती थैली उचलली आणि तिथून बाहेर पडला.

जेव्हा तो इसम घाईघाईने घरी परत जाऊ लागला तेव्हा हमायागने पुन्हा एकदा थैली हळूच काढून घेतली, दगड काढून त्यात दागिने ठेवले आणि थैली त्या माणसाला दिली. दोन्ही चोर त्या माणसाच्या मागेमागे काय गंमत होते ते पाहण्यसाठी निघाले. घरी आल्यावर तो बायकोला खूप रागावला. तिने निमुटपणे ऐकून घेतलं. दोन्ही लुटारू खिडकीतून सगळं पाहत होते. मग तिने ती थैली उघडली आणि पाहते तर काय, सगळे दागिने जागच्या जागी होते.

"तुम्ही काय बोलता आहात?", तिने विचारलं. "मी तुम्हाला दागिन्यांच्या ऐवजी दगड का म्हणून देईन?"




त्या इसमाने गोंधळलेल्या मनाने थैली उचलली आणि तो पुन्हा सोनाराच्या दुकानाकडे निघाला. हमायागचं काम अजून संपलं नव्हतं. पुन्हा एकदा त्याने त्या थैलीतून दागिने काढून त्या जागी दगड ठेवले. दोन्ही चोर काय घडतंय हे पाहण्यासाठी पुन्हा त्याच्या पाठीमागे गेले. दुकानात आल्यावर त्याने थैली उघडली आणि त्याला धक्काच बसला. सराफाचा आता संयम सुटू लागला. ते पाहून त्या गरीब माणसाने दगड गोळा केले, थैलीत घातले आणि तिथून पोबारा केला.



ते पाहून चोर खळखळून हसले. हमायागचा खेळ चालूच होता. त्याने पुन्हा एकदा दगडाच्या जागी दागिने ठेवले. तो बायकोला पुन्हा एकदा ओरडला. पण त्याचा काही उपयोग झाला नाही कारण बायकोने पुन्हा एकदा दाखवून दिलं की तो फारच मुर्खासारखा वागतो आहे.

"तुम्हाला कमी दिसतंय की डोकं काम करीत नाही आहे?" ती ओरडली. "आताच्या आता माझे दागिने घेऊन जा आणि काही व्हायच्या आत दुरुस्त करून परत आणा."




आता तिसऱ्यांदा तो इसम दागिने घेऊन घराच्या बाहेर पडला तेव्हा पुन्हा तिसऱ्या वेळी हमायागने दागिन्याच्या जागी दगड ठेवले. तो इसम दुकानात पोचला. सोनाराने जेव्हा थैली उघडली तेव्हा त्याला परत त्यात दगडच दिसले. हा माणूस नक्कीच आपली चेष्टा करतो आहे अशी त्याची पक्की समजूत झाली. त्याने त्या माणसाला दुकानातून हाकलून दिलं.

"पुन्हा माझ्या दुकानात पाऊल ठेवू नकोस!" सोनार गरजला.

तो माणूस पुन्हा दुकानात यायचा प्रश्नच नव्हता. कारण हमायागने त्याचे दागिने केव्हाच लंपास केले होते.

“चल, आता रात्र पडायला लागली आहे." हमायागने आपल्या साथीदाराला सांगितलं. “तू किती चलाख आहेस ते बघू तरी दे मला.”
हरादने काही खिळे आणि हातोडी घेतली आणि हमायागला बरोबर घेऊन इशखानच्या महालाकडे निघाला. हमायागला त्याने आपल्या खांद्यावर बसायला सांगितले. हातोडीने खिळे ठोकत ठोकत ते महालाची भिंत चढून आत आले.





भिंत चढून आत आल्यावर हमायागला एकदम भुकेची जाणीव झाली.


"ठीक आहे.", हराद म्हणाला. "आपण इकडे मस्त मेजवानी करू."

त्याने इशखानच्या महालातल्या कोंबडीच्या खुराड्यामधून सगळ्यात गुबगुबीत कोंबडी पकडली. शेकोटी पेटवली आणि जेवणासाठी खरपूस कोंबडी भाजली. हमायागला कुणाचं आगीकडे लक्ष जाईल की काय ह्याची काळजी वाटत होती. पण त्यांना तिथे कुणीही सुरक्षारक्षक दिसला नाही. पोटभर जेवण झाल्यावर त्यांनी हाडं तिथेच टाकली.



त्यांनी महालात प्रवेश केला आणि हराद थेट इशखानच्या खोलीकडे निघाला. हमायाग सावधपणे त्याच्या मागे चालत होता. दाराच्या बाहेर एक झोपाळलेला सुरक्षा रक्षक बसला होता. डोळ्यावर झापड येऊ नये म्हणून तो तंबाखूची गोळी चघळत होता. हरादने भिंतीवर एक दगड फेकला. त्या आवाजाने शिपाई एकदम चमकला आणि गोळी त्याच्या तोंडातून खाली पडली. त्याने भिंतीजवळ जाऊन कसला आवाज आला हे तपासलं पण बहुदा भास झाला असावा असं वाटून तो परत जागेवर येऊन बसला. तोंडातली गोळी पडल्यामुळे त्याला पाचच मिनिटात गाढ झोप लागली.

दोन्ही चोर इशखानच्या खोलीत घुसले. त्याला उठवण्यासाठी हरादने जोरजोरात पलंग हलवला. अर्धवट झोपेत इशखानने काय झालं असं विचारलं. हरादने इशखानला सांगितलं की त्याला काही महत्वाचं ठरवायचं आहे.



"कोणे एके काळी....," हराद बोलू लागला. "दोन चोर होते. ते एकाच मुलीवर प्रेम करत होते."


"हे कसं शक्य आहे?" झोपेतच इशखानने विचारलं.

"चोरांना ह्याची अजिबात कल्पना नव्हती.", हराद म्हणाला. "जोपर्यंत त्या दोघांनी सारख्याच शेजारच्या प्रांतात जायचं ठरवलं नव्हतं."

हरादने त्या दिवसाचा सगळा घटनाक्रम सांगितला. त्याने इशखानला एहलिजाचं रहस्य कसं समजलं आणि कुठला चोर तिच्याशी लग्न करेल ह्यासाठी लावलेल्या पैजेबद्दल सांगितलं.

इशखानला वाटलं की तो एखादं सुरस स्वप्नं पाहतो आहे.

हरादने त्याला दिवसा चोरी करणाऱ्या लुटारुबद्दल सांगितलं. त्याने तीन वेळा एकाच माणसाची कशी चलाखीने चोरी केली होती. इशखानला दिवसा चोरी करणारा चोर फारच हुशार आहे हे अगदी पटलं.



मग हरादने त्याला रात्रीच्या लुटारुबद्द्ल सांगितलं. रात्रीचा डाकू कसा इशखानच्या महालाची भिंत चढून आत आला, त्याने महालातली कोंबडी पकडून भाजून कशी खाल्ली आणि हाडं तिथेच टाकली. त्याशिवाय तो चोर हिंमत करून इशखानच्या खोलीत शिरला.

"अशक्य!" इशखान हसत म्हणाला. "भिंतीवर चढून येण्याचा प्रयत्न करताना किंवा कोंबडी भाजून खाताना ते नक्कीच पकडले गेले असते. ही कहाणी खरी असणं शक्यच नाही."

"नसेलही कदाचित." हराद म्हणाला. "पण बुध्दिमान इशखान, मला सांग की दोन चोरांमध्ये कुठला चोर जास्त चलाख आहे?"

"नक्कीच रात्रीचा चोर जास्त चतुर आहे," इशखान म्हणाला. "पण तो दिवसाचा चोरही तेवढाच चतुर आहे." एवढं बोलून इशखान गाढ झोपी गेला.

दुसऱ्या दिवशी सकाळी इशखानला दोन चतुर लुटारूंचं स्वप्न आठवलं. इकडे पहारेकऱ्याने ठरवलं की कोंबडीची हाडं पडलेली मिळाली त्याबद्दल इशखानला काही सांगायचं नाही. दरम्यान हराद आणि हमायाग दोघांनीही निर्णय घेतला की त्यांची प्रेमिका त्या दोघांच्याही लायक नाही. आणि एका गोष्टीवर दोघेही सहमत झाले की ह्या नवीन प्रांतामध्ये चोरी करणं त्यांच्यासाठी जास्त लाभदायक आहे त्यामुळे दोघेही नवीन प्रांतात राहू लागले.





आणि इकडे एरजिंगा गावामध्ये एहलिजालाही लवकरच आपलं नवीन भविष्य सापडलं.

समाप्त